
।।श्रीराम समर्थ।।

# श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड संचालित

# श्रीमद् ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा/ई-मेलद्वारा)




किंमत १०/-रु.


**'श्री.दा.अ.', श्रीसमर्थ सोसायटी,**

**धन्वंतरी सभागृहामागे, पटवर्धनबाग, एरंडवणा, पुणे ४११००४.**

**मो. ८६६९४०५९७१ (व्हॉटस् अप)**

**ई-मेल : dasbodh.abhyas@gmail.com**

**वेबसाईट : www.dasbodhabhyas.org**


।।जय जय रघुवीर समर्थ।।

# समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड संचलित श्रीमत् ग्रंथराज

# दासबोध अध्ययन

## केंद्र संचालकांची यादी

**✲ अध्यक्ष ✲**

श्री. सुहास क्षीरसागर

**✲ मार्गदर्शक मंडळ ✲**

श्री. योगेशबुवा रामदासी　　श्री. विजय गाडगीळ　　श्री. विक्रम केळकर

## केंद्रसंचालक

१. **पुणे अहमदनगर बृहन महाराष्ट्र**
श्रीमती कल्पना रमेश धर्माधिकारी
९८८१०२३७६०

२. **ई–मेल द्वारे**
श्री. सुहास कुलकर्णी
७२७६०९ ८९२७

३. **संपूर्ण मुंबई महानगर व नवी मुंबई**
श्री. संतोष नारायण सप्रे
९९७५१३२२३४

४. **जिल्हा रायगड ठाणे पालघर**
सौ. नीलम जोशी
९८५०८२९९३४

५. **जिल्हा सातारा सोलापूर**
श्री. अनंत विश्वनाथ बोधे
९६ ०४ ३ ३५ २३

६. **संभाजीनगर, बीड जालना परभणी, हिंगोली, नांदेड उस्मानाबाद लातूर**
सौ. मानसी याडकिकर
९७ ३० ५० ६३

७. **नांदेड विभाग**
सौ. माधवी बाळासाहेब पानसे
९९२३९५८९८१

८. **वर्धा नागपूर चंद्रपूर भंडारा**
श्री. रमेश वासुदेव फडके
९८५०७ ०४३४

९. **जिल्हा सांगली कोल्हापूर रत्नागिरी**
सौ. ज्योती कोरबू
९४२२६१८२०३

१०. **अकोला बुलढाणा अमरावती यवतमाळ वाशिम**
श्री प्रदीप गणोरकर
८२७५७२९१२९

११. **मध्य प्रदेश**
डॉ. अश्विन भागवत
९८२६०२४१३७

१२. **दिल्ली विभाग**
सौ मंगला अजित कवठेकर
९८१८८८४७१४

१३. **दुबई**
श्री. सलील जामखेडकर
+९७१ ५५ २२८ ५०८०

१४. **अमेरिका**
सौ. निवेदिता पाठक
+१(४८०) ७०३ १९०७

# समर्थ सेवा मंडळ,
# सज्जनगड संचलित श्रीमत् ग्रंथराज
# दासबोध अध्ययन

## सह-केंद्र संचालकांची यादी

१. **सह केंद्र–संचालक (पुणे–पिंपरी–चिंचवड विभाग)**
सौ. अपर्णा धनंजय कुलकर्णी
७७७४९१८१२६

२. **सह केंद्र–संचालक (ईमेल–द्वारे )**
श्री. केदार परांजपे
८८८८८१२६८४

३. **सह केंद्र–संचालक (मुंबई )**
श्री आमोद रिझबूड
९५९४७६१६४३

४. **सह केंद्र–संचालक (छत्रपती संभाजीनगर–देवगिरी)**
श्री. श्रीकांत कृ. देशपांडे
९४२०९३४७८०

५. **सह केंद्र–संचालक (कोल्हापूर)**
श्री. नारायण आ. कुलकर्णी
९४२२४१३८८३

६. **सह केंद्र–संचालक (नांदेड)**
सौ. प्रणिता रा. कुलकर्णी
९०११३०४७११

७. **सह केंद्र–संचालक (दिल्ली)**
सौ. पूजा साल्पेकर
९८११७३९९८९

८. **सह केंद्र–संचालक (अकोला)**
सौ. श्रद्धा उमेश लांडगे
९४२१८२०६८५

९. **सह केंद्र–संचालक (अकोला)**
श्री. नारायण टू. अलकरी
९६०४००२२०७

१०. **सह केंद्र–संचालक (मध्य प्रदेश)**
सौ. जयश्री चौधरी
९८९३६४७६७७

११. **सह केंद्र–संचालक (मध्य प्रदेश)**
सौ. अश्विनी गद्रे
८९९९९६५५९२

१२. **सह केंद्र–संचालक (ठाणे)**
सौ. सुप्रिया वि. आठवले
९०२९०७३८२८

१३. **सह केंद्र–संचालक (गोमांतक)**
सौ. मीरा अ. चाफाडकर
८९७५५७६२४६

१४. **सह केंद्र–संचालक (सांगली–रत्नागिरी)**
डॉ. सौ. निशिगंधा अ. पोंक्षे
९९७५८५४५६५

१५. **सह केंद्र–संचालक (सांगली)**
सौ. अनघा पटवर्धन
९५११९१४७३८

१६. **सह केंद्र–संचालक (कराड)**
श्री. रामचंद्र ब. कुलकर्णी
९७३०८१६९९६

१७. **सह केंद्र–संचालक (नागपूर)**
श्री. मिलिंद बळवंतराव वझलवार
९८२३०५८०६०

।।श्रीराम समर्थ।।

**श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड**

# श्रीग्रंथराज दासबोध अध्ययन

**।।क्रिया करूनी करवावी। बहुतांकरवी।।**

**अभ्यास दासबोधाचा.... विकास व्यक्तिमत्त्वाचा**

# तीन वर्षाचा पत्राद्वारे अभ्यासक्रम

## सद्यस्थितीवर एकमेव उपाय - दासबोध अभ्यास.....!

## विचार करा.....

आपण समाधानी आहात काय? माणसाचे खरे समाधान कशात आहे? आपल्या प्रयत्नांना दरवेळी यश येतेच का? आपल्या जीवनाचे अंतिम ध्येय काय आहे हे आपणास माहित आहे काय? थोडे आत्मपरीक्षण केल्यास या साऱ्या प्रश्नांचे एकच उत्तर आढळते......

**नाही..... नाही.... नाही.....!**

'अस्थिरता, अनिश्चितता, असमाधान आणि भीती' अशीच सध्याची परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत काय केले पाहिजे आणि ते कसे करता येईल? याचा सर्वांगीण विचार आणि शिकवण दासबोधात आहे. आपल्यात परिवर्तन घडवून आणण्याची ही एक सुवर्णसंधी आहे.

**दासबोध म्हणजे साक्षात समर्थ रामदासच....!**

**दासबोधाच्या अभ्यासातून काय साध्य होईल?**

१. व्यक्तिमत्त्व विकास आणि स्वावलंबनाची सवय यामुळे परिस्थितीवर नियंत्रण करण्याची तुमची क्षमता वाढेल.

२. परस्परावलंबित्वाची योग्य जाण निर्माण करून सहकार्याची भावना वाढेल. इतर अनेकांच्या मदतीने परिस्थितीवर नियंत्रण करण्याची योग्य दिशा आपणांस मिळेल.

३. योग्य तत्त्वज्ञानाची स्पष्ट दृष्टी आपल्याला मिळते. त्यातून नियंत्रणाच्या पलिकडे असलेल्या परिस्थितीला तोंड देण्याची क्षमता आपल्यात येईल.

श्रीमद् ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा आणि ई-मेलद्वारा) हा अभ्यास प्रश्नोत्तररूपी आहे. त्यातून विचारांना योग्य दिशा मिळते. अभ्यासात सातत्य असल्याने विचारातून परिवर्तन होऊन दासबोधाचे अंतरंग उलगडत जाते.

आध्यात्मिक संकल्पना स्पष्ट होतात. नरदेहाचे महत्त्व, मर्यादा आणि सार्थक कशात आहे हे कळते. देव ही काय कल्पना आहे आणि तो कसा शोधावा याचा मार्ग सापडतो. प्रपंच परमार्थस्वरूप होतो. जीवनाविषयी नवीन दृष्टी लाभून आत्मचिंतनाची सवय लागते. 'आत्मिक विकासाबरोबर समाजाचा विकास' ही विचारधारा दृढ होऊ लागते.

दासबोधातील कित्येक ओव्या रोजच्या जीवनात नैराश्यप्रसंगी मानसिक धीर देऊन नवचैतन्य निर्माण करतात. अडचणीच्या प्रसंगी मार्गदर्शक होतात. मनातले संभ्रम दूर करतात. अनाठायी असलेल्या आसक्ती कमी करतात. योग्य व्यवहार लक्षात घेऊन तो आचरणात आणण्याचे बल देतात. आत्मविश्वास वाढतो. साधेच पण निश्चित गुणकारी असेच हे आहे असा अनेक अभ्यासार्थींना अनुभव आहे.

**प्रवेश प्रक्रिया :**

१) अभ्यासार्थींनी **पहिला स्वाध्याय** अगदी सावकाशपणे वाचून सोडवावा. पाच प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुमारे एक फूलस्केप कागद लागतो.

२) सोबत पुढील पूर्ण माहिती लिहिलेले **संकल्प पत्र** (स्वतःची साक्षरी करून) पाठविणे आवश्यक आहे. पूर्ण नाव, स्वतःचा पूर्ण पत्ता, पत्ता पिनकोडसह, संपर्कासाठी फोन नंबर व मोबाईल नंबर, ईमेल (असल्यास) वय, शिक्षण, व्यवसाय, छंद, वाचन, सामाजिक कार्य, आपणास उपक्रमात कोणी आणले त्याचे नाव व त्याचा संपर्क फोन (असल्यास) देणे.

३. उत्तरासाठी **स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकिट** (ई-मेलद्वारे आवश्यक नाही) पाठवावे. त्यातून आपणास पहिल्या स्वाध्यायाचे समीक्षण, काही पुढील अभ्यासासंबंधी व्यावहारिक सूचना आणि पुढील स्वाध्याय दरमहा ज्या समीक्षकांकडे पाठवायचे आहेत त्यांचे नांव, पत्ता, संपर्कासाठी फोन नं. ही माहिती पाठविली जाते. उपक्रम पत्रद्वारे/ई-मेलद्वारे असल्याने वरील सर्व माहिती परिपूर्ण असणे महत्त्वाचे आहे. तसेच त्यातील बदल त्वरित कळविणेही आवश्यक आहे.

केंद्र संचालकांकडे **पहिला स्वाध्याय, प्रवेश पत्रिका, संकल्प पत्र (पत्राद्वारे करायचा असल्यास उत्तरासाठी स्वतःचा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीट)** या तीनही गोष्टी आपण ज्या विभागात राहतो त्या विभाग केंद्र संचालकांकडे पोस्टाचे पाकीटातून पाठविणे आवश्यक आहे. (विभाग व केंद्रसंचालकांचे पत्ते पान नं. २वर दिले आहेत.) कोणतीही त्रुटी असल्यास प्रवेश दिला जाणार नाही.

**अभ्यासक्रमाचे शुल्क :**

प्रवेश, परिचय, आणि प्रबोध असा हा तीन वर्षांचा, ३६ स्वाध्यायाचा अभ्यासक्रम असून तिन्ही वर्षांचे **एकत्रित शुल्क रु.५००/-** इतके आहे. पहिला स्वाध्याय स्वीकारार्ह असल्यास अभ्यासक्रमाचे शुल्क भरून आपला अभ्यासार्थी क्रमांक/समीक्षक क्रमांक निश्चित करावा. अभ्यासार्थी क्रमांक मिळाल्यावर शुल्क भरावे. आपला तीन वर्षांचा अभ्यासक्रमासाठी लागणारा ग्रंथ आणि सामुग्री (**स्वाध्याय-साधन) आपल्या पत्त्यावर पाठवली जाईल.** हे स्वाध्याय साधन आपल्या तिन्ही वर्षाच्या अभ्यासासाठी लागणार आहे. त्याचे मूल्य आपल्या अभ्यासक्रमाच्या शुल्कामध्ये समाविष्ट आहे.

आपण अभ्यासक्रमाचे शुल्क भरल्यावर श्री सज्जनगडावरून श्री समर्थांचा प्रसाद आणि स्वाध्याय साधन आपण संकल्प पत्रावर दिलेल्या पत्त्यावर पोस्टाने पाठवण्यात येईल. पैसे भरल्यानंतर ३० दिवसांत स्वाध्याय साधन आपल्या पत्त्यावर न आल्यास या क्रमांकावर **८६६९४०५९७१** संपर्क साधावा.

**अभ्यासक्रमाची रूपरेषा :**

१) पत्रद्वारे अभ्यास करायचा असल्यास दोन्ही बाजूंचा टपालखर्च अभ्यासार्थींना करावा लागतो. स्वाध्याय साधन मध्ये दिलेला ग्रंथराज दासबोध हेच मुख्य पुस्तक.

२) अभ्यासक्रम तीन वर्षांचा आहे. दरवर्षाच्या शेवटी प्रशस्तीपत्र दिले जाते. (दासबोध प्रवेश, दासबोध परिचय, दासबोध प्रबोध) दासबोधात अध्यायाऐवजी समास हा शब्द वापरलेला आहे. दहा समासांच्या संचाला दशक म्हणतात. असे वीस दशक म्हणजे २०० समास आहेत. पहिल्या वर्षी निवडक १२ समास, दुसऱ्या वर्षी निवडक २६ समास आणि तिसऱ्या वर्षी निवडक ३५ समास अभ्यासता येतात.)

३) अभ्यास प्रश्नोत्तररूपी आहे. दरमहा एक स्वाध्याय समीक्षकांकडे उत्तराच्या पोस्टेजसह (ईमेलद्वारे पोस्टेज आवश्यक नाही) पाठवायचा असतो. त्या त्या महिन्यातील समासांचे महिनाभर वाचन-मनन अपेक्षित आहे. (या वाचनाला सुमारे दहा मिनिटे पुरतात.)

४) अभ्यासक्रमाची रचना, माहीत असलेल्या विषयातून क्रमाक्रमाने नवीन संकल्पनाकडे जाणारी अशी केली आहे.

त्या त्या समासांच्या नियमित वाचन, चिंतन, मननामुळे आणि समीक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विचारांना दिशा मिळते. सातत्यामुळे विचारातून आचार परिवर्तन होते. व्यक्तिमत्त्व विकास होतो. समर्थांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे ''आता श्रवण केलियाचें फळ। क्रिया पालटे तत्काळ। तुटे संशयाचे मूळ। एकसरा।।'' हा अनुभव येतो.१.१.२८।।

आता पुढील स्वाध्याय सावकाश वाचा व सोडवा. नंतर फक्त ओव्या काही दिवस सावकाश वाचा आणि नियमित अभ्यासाचा संकल्प करून जरूर प्रवेश घ्या.

**।।जय जय रघुवीर समर्थ।।**

# श्रीदासबोध

## दासबोध प्रवेश : स्वाध्याय १ लाः दशक १ समास १ : ग्रंथारंभ लक्षण

सारांश : ग्रंथारंभलक्षण द.१ स.१ हा समास म्हणजे दासबोध ग्रंथाची श्रीसमर्थांनी स्वतःच लिहिलेली प्रस्तावना आहे. त्यात सांगितलेली ग्रंथाची फलश्रुती अत्यंत मार्मिक आहे. या ग्रंथाच्या अभ्यासाने मनुष्याच्या अंतरंगात बदल घडतो. त्यामुळे त्याची क्रियाच पालटते. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा यात आहे. २८व्या ओवीपासून ३७व्या ओवीपर्यंत फलश्रुती वाचल्यानंतर असे आढळून येते की, श्रीसमर्थांची इच्छा अशी होती की, अवनतीला गेलेल्या समाजाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी त्यांना येथील माणूस नव्याने घडवावयाचा होता. आजच्या काळातसुद्धा समर्थविचारांचा माणूस घडविणे ही काळाजी मागणी आहे. म्हणून दासबोधाच्या अभ्यासाची गरज आहे.

हा समास प्रस्तावनारूप आहे. आपल्या ग्रंथाचे नाव काय, ग्रंथ लिहिण्याचा हेतू काय, ग्रंथात विवेचिलेले विषय कोणते, ग्रंथाच्या अभ्यासाचे फल काय, ग्रंथातील प्रमेयांना आधार कोणते इत्यादी गोष्टी श्री समर्थांनी येथे आरंभीच स्पष्टपणे सांगितल्या आहेत.

**।।श्रीराम।।**

**श्रोते पुसती कोण ग्रंथ। काय बोलिलें जी येथ। श्रवण केलियानें प्राप्त। काय आहे।।१।।**

**ग्रंथा नाम दासबोध। गुरुशिष्यांचा संवाद। येथ बोलिला विशद[१]। भक्तिमार्ग।।२।।**

**नवविधा भक्ति[२] आणि ज्ञान। बोलिलें वैराग्याचें लक्षण। बहुधा अध्यात्मनिरोपण। निरोपिलें।।३।।**

**भक्तिचेन योगें देव। निश्चयें पावती मानव। ऐसा आहे अभिप्राव। ईये ग्रंथीं।।४।।**

**मुख्य भक्तीचा निश्चयो। शुद्धज्ञानाचा निश्चयो। आत्मस्थितीचा निश्चयो। बोलिला असे।।५।।**

**शुद्ध उपदेशाचा निश्चयो। सायोज्यमुक्तीचा निश्चयो। मोक्षप्राप्तीचा निश्चयो। बोलिला असे।।६।।**

**शुद्ध स्वरूपाचा निश्चयो। विदेहस्थितीचा निश्चयो। अलिप्तपणाचा निश्चयो। बोलिला असे।।७।।**

**मुख्य देवाचा निश्चयो। मुख्य भक्ताचा निश्चयो। जीवशिवाचा निश्चयो। बोलिला असे।।८।।**

**मुख्य ब्रह्माचा निश्चयो। नाना मतांचा निश्चयो। आपण कोण हा निश्चयो। बोलिला असे।।९।।**

**मुख्य उपासनालक्षण। नाना कवित्वलक्षण। नाना चातुर्यलक्षण। बोलिलें असे।।१०।।**

**मायोद्भवाचे लक्षण। पंचभूतांचे लक्षण। कर्ता कोण हें लक्षण। बोलिलें असे।।११।।**

**नाना किंत[३] निवारिले। नाना संशयो छेदिले। नाना आशंका फेडिले। नाना प्रश्न।।१२।।**

**ऐसें बहुधा निरोपिलें। ग्रंथगर्भी जें बोलिलें। तें अवघेंचि अनुवादिले। न वचे किं कदा।।१३।।**

**तथापि अवघा दासबोध। दशक फोडून केला विशद। जे जे दशकींचा अनुवाद। ते ते दशकीं बोलिला।।१४।।**

**नाना ग्रंथांच्या संमती। उपनिषदें वेदांतश्रुती। आणि मुख्य आत्मप्रचीती। शास्त्रेंसहित।।१५।।**

**नाना समतीअन्वये। म्हणौनी मिथ्या म्हणतां न ये। तथापि हें अनुभवासि ये। प्रत्यक्ष आतां।।१६।।**

**मत्सरें यासी मिथ्या म्हणती। तर अवघेचि ग्रंथ उछेदती। नाना ग्रंथांच्या समती। भगवद्वाक्यें।।१७।।**

**शिवगीता रामगीता। गुरुगीता गर्भगीता। उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदांत।।१८।।**

**भगवद्गीता ब्रह्मगीता। हंसगीता पांडवगीता। गणेशगीता येमगीता। उपनिषदें भागवत।।१९।।**

**इत्यादिक नाना ग्रंथ। समतीस बोलिले येथ। भगवद्वाक्यें येथार्थ। निश्चयेंसीं।।२०।।**

**भगवद्वचनीं अविश्वासे। ऐसा कोण पतित असे। भगवद्वाक्याविरहित नसे। बोलणें येथीचें।।२१।।**

**पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। तो दुरात्मा दुरभिमान। मत्सरें करी।।२२।।**

**अभिमानें उठे मत्सर। मत्सरें ये तिरस्कार। पुढें क्रोधाचा विकार। प्रबळे बळे।।२३।।**

**ऐसा अंतरी नासला। कामक्रोधें खवळला। अहंभावे पालटला। प्रत्यक्ष दिसे।।२४।।**

**कामक्रोधें लिथाडिला[४]। तो कैसा म्हणावा भला। अमृत सेंवितांचा पावला[५]। मृत्य राहो।।२५।।**

**आतां असो हें बोलणें। अधिकारासारिखें घेणें। परंतु अभिमान त्यागणें। हें उत्तमोत्तम।।२६।।**

**मागां श्रोतीं आक्षेपिलें। जी ये ग्रंथी काय बोलिलें। तें सकळही निरोपिलें। संकळीत मार्गें[६]।।२७।।**

**आता श्रवण केलियाचें फळ। क्रिया पालटे तत्काळ। तुटे संशयाचें मूळ। येकसरां।।२८।।**

**मार्ग सांपडे सुगम[७]। न लगे साधन दुर्गम। सायोज्यमुक्तीचे[८] वर्म। ठाई पडे।।२९।।**

**नासे अज्ञान दुःख भ्रांती। शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती। ऐसी आहे फळश्रुती। इये ग्रंथीं।।३०।।**

**योगियांचें परम भाग्य। आंगीं बाणे तें वैराग्य। चातुर्य कळे यथायोग्य। विवेकेंसहित।।३१।।**

**भ्रांत अवगुणी अवलक्षण। तेचि होती सुलक्षण। धूर्त तार्किक विचक्षण। समयो जाणती।।३२।।**

**आळसी तेचि साक्षपी[९] होती। पापी तेचि प्रस्तावती। निंदक तेचि वंदूं लागती। भक्तिमार्गासी।।३३।।**

**बद्धचि होती मुमुक्ष। मूर्ख होती अतिदक्ष। अभक्तचि पावती मोक्ष। भक्तिमार्गें।।३४।।**

**नाना दोष ते नासती। पतित तेचि पावन होती। प्राणी पावे उत्तमगती। श्रवणमात्रें।।३५।।**

**नाना धोके देहबुद्धीचे। नाना किंत संदेहाचे। नाना उद्वेग संसाराचे। नासती श्रवणें।।३६।।**

**ऐसी याची फलश्रुती। श्रवणें चुके अधोगती। मनास होय विश्रांति। समाधान।।३७।।**

**जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा। मत्सर धरी जो पुंसा[१०]। तयास तेंचि प्राप्त।।३८।।**

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ग्रंथारंभलक्षणनाम समास प्रथम।।१।।**

१) विशद - स्पष्ट, २) नवविधाभक्ति - श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, पूजन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन. ३) शंका, ४) लिथाडिला - बरबटला, ५) 'अमृत सेवितांच पावला। मृत्य राहो।।' अमृताचे सेवन करूनसुद्धा दुष्टबुद्धीमुळे राहू मृत्यू पावला, या पौराणिक कथेचा हा उल्लेख आहे. ६) सकळीत मार्गे - सारांशाने, ७) सुगम - सोपा, ८) सायोज्यमुक्ती - परमात्मरूपाशी एकरूप होणे, ९) साक्षपी - उद्योगी. १०) पुंसा - पुरुष.

### भावार्थ

ज्या श्रोत्यांसमोर ग्रंथ ठेवला आंहे ते लगेचच प्रश्न स्वाभाविकपणे विचारतात, हा कोणता ग्रंथ आहे? त्यामध्ये काय सांगितले आहे आणि त्याचे श्रवण केल्यावर आम्हाला फलप्राप्ती काय होईल? ।।१।।

श्रीसमर्थ सांगतात, या ग्रंथाचे नाव दासबोध आहे. यात गुरु आणि शिष्य यांचा संवाद असून यात भक्तिमार्गाचे सुस्पष्ट विवेचन आहे. (संवादरूपाने ग्रंथ लिहिण्याची पद्धती श्रीसमर्थांनी स्वीकारली आहे. गीतेसारख्या सर्वमान्य ग्रंथामध्ये अशीच पद्धत आहे. दासबोधात तिचे अनुकरण आहे.) ।।२।।

दासबोधामध्ये ईश्वरभक्तीचे नऊ मार्ग, ब्रह्मज्ञान तसेच वैराग्याचे लक्षण सांगितले आहे. बहुधा नाना प्रकारांनी अध्यात्मनिरूपण केले आहे. (यातून आणखी एक अर्थ निघतो की इतरही अनुषंगिक विषय ग्रंथात आहेत. पण अध्यात्म हाच प्रमुख विषय आहे. इतर विषयात मूर्खलक्षणे, लेखन प्रक्रिया, राजकारण, निःस्पृहव्याप, इत्यादि कितीतरी विषय आले आहेत.) ।।३।।

माणसाला भक्तिमार्गानेच ईश्वराची प्राप्ती निश्चितपणे होते असा या ग्रंथाचा अभिप्राय आहे. (दासबोधाचा प्रधान सिद्धांत कोणता, तोच या ओवीमध्ये सांगितला आहे. ।।४।।

(कोणत्या गोष्टींचे सुस्पष्ट विवेचन ग्रंथात आहे ते यानंतरच्या ७ ओव्यांमध्ये सांगतात.) ज्या भक्तीमुळे ईश्वरप्राप्ती होते तीच मुख्य आहे. तिचे निश्चित स्वरूप, शुद्ध ज्ञान कोणते, आत्मस्थिती म्हणजे काय, यांचेही संदेह निवळून टाकणारे विवेचन ग्रंथात सांगितले आहे.।।५।।

अध्यात्मामध्ये आत्मानुभव देणाऱ्या ज्ञानालाच शुद्ध ज्ञान किंवा ज्ञान ही संज्ञा आहे.

ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान। पाहावें आपणासि आपण। या नांव ज्ञान।।५-६-१।।

ओवीनंतर ५-६-१ असे ३ अंक लिहिले असता त्याचा अर्थ दशक ५ समास ६ मधील १ली ओवी असा आहे. नव्यानेच दासबोधाचा अभ्यास करणाऱ्यांना ही माहिती आवश्यक आहे. या पुस्तकात अनेक ठिकाणी असे आकडे ओवीनंतर दिलेले आढळतील.) ।।५।।

शुद्ध उपदेश, सायुज्य मुक्ती, मोक्षप्राप्तीचे लक्षण यांचे निश्चित स्वरूपात निरूपण यात आहे. (मुक्तीचे चार प्रकार आहेत - स्वलोकता, समीपता, स्वरूपता आणि सायुज्यता. त्यातील पहिल्या तीन मुक्ती अशाश्वत असून फक्त सायुज्यमुक्ती शाश्वत असल्याचे द. ४-१०-२७ मध्ये सांगितले आहे. अधिक माहितीसाठी दशक ४, समास १० जरूर तर पहावा.) ॥६॥

शुद्ध आत्मस्वरूप कसे असते, विदेह अवस्था कशी असते, अलिप्तपणा नेमका अर्थ काय हे यात सांगितले आहे. ॥७॥

मुख्य देव (किंवा परब्रह्म) कोणता, खरा भक्त कोणास म्हणावे, जीव आणि शिव यांचे संबंधात सुस्पष्ट किवा निश्चयाचे ज्ञान या ग्रंथात आहे. ॥८॥

मुख्य ब्रह्माचे निरुपाधी स्वरुप, अनेक प्रकारचे वैचारिक भेद ाणि आपली (म्हणजे मानवी जिवाची) स्थिती याबद्दल संशयातीत निरूपण येथे आहे. ॥९॥

उपासनेचे प्रमुख लक्षण, काव्याची लक्षणे, विविध प्रकारची चातुर्य लक्षणे यात दिली आहेत. ॥१०॥

माया कशी निर्माण झाली, पंचभूतांची लक्षणे व त्या सर्वांच्या निर्मात्याचे स्वरूपलक्षण यांचे निश्चित ज्ञान येथे आहे. ॥११॥

शिष्यांचे नाना संशय या ग्रंथात निवारले आहेत. नाना आशंका (चुकीच्या समजुती) नाहीशा केल्या असून अनेक प्रश्नांची उत्तरे देऊन शिष्याला संदेहरहित केले आहे. (किंत संशय, आशंका आणि प्रश्न हे चार संशयाचे सूक्ष्म छटादर्शक शब्द या ओवीत आहेत.) ॥१२॥

अशा अनेक विषयांवर निरूपण या ग्रंथामध्ये केले आहे. त्या सर्वांचा उल्लेख (प्रारंभीच) करता येणे शक्य नाही. ॥१३॥

तथापि सगळ्या ग्रंथाचे दशकवार विभाग केले असून प्रत्येक दशकात जो विषय मांडला आहे त्याचे नाव त्याला दिले आहे. (दासबोधातील प्रकरणांना 'समास' म्हणतात. दहा समासांच्या गटाला दशक म्हणतात.) ॥१४॥

या ग्रंथाला उपनिषदे, वेदान्त, श्रुती यासारख्या धर्मग्रंथांचा आधार घेतला असून मुख्य आधार आत्मज्ञानाच्या स्वानुभवाचा आहे. ॥१५॥

या  ग्रंथाला आधार असल्याने तो खोटा असल्याचे म्हणता येणार नाही. तथापि याचा अनुभव पुढे येईलच.॥१६॥

मत्सरामुळे हे लोक या ग्रंथाला खोटा किंवा चुकीचा म्हणतील पण त्यामुळे सर्व आधारभूत ग्रंथांना आणि वेदासारख्या ईश्वरवचनांना खोटे म्हटल्याप्रमाणे होईल. (प्रत्यक्ष ईश्वरापासून प्राप्त झालेले ज्ञा म्हणजेच वेद. हे ज्ञान आठवून ऋषींनी जे ग्रंथ लिहिले त्यांना 'श्रुती' म्हणतात.) १८ ते २० या ओव्यांमध्ये संदर्भासाठी घेतलेल्या आधारग्रंथांची यादीच श्रीसमर्थ देत आहेत. ॥१७॥

शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, वेद आणि वेदान्त, भगवद्गीत्ता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता, यमगीता, उपनिषदे आणि भागवत या ग्रंथांचा आधार घेतला आहे. हे सर्व ग्रंथ निश्चयपूर्वक भगवंताची सत्यवचने आहेत. (श्रीसमर्थांनी मूळ संस्कृतातील हे सारे ग्रंथ त्यांच्या तपश्चर्याकाळात अभ्यासिले होते. त्यातील ज्ञानाचा आधार घेऊन मराठीमध्ये दासबोधाचे लेखन केल्यामुळे वाचकांची केवढी तरी सोय झाली आहे. ज्या अभ्यासार्थींना या आधारग्रंथांची अधिक माहिती हवी असेल त्यांनी डॉ. शं. ना. पेंडसे यांच्या 'राजगुरू समर्थ रामदास' या ग्रंथातील प्रकरण १ले पहावे.) ॥१८, १९, २०॥

या ग्रंथातील विवेचन म्हणजे भगवद्वाक्येच आहेत त्यावर अविश्वास करील असा कोणी पापी मनुष्य असू शकेल का? येथील कोणताही उपदेश भगवद्वचनाहून वेगळा नाही. ॥२१॥

ग्रंथाचे पूर्णपणे वाचन न करताच त्याला जो दोष देतो तो दुष्ट बुद्धीचा असतो. त्या माणसाचा दुराभिमान व मत्सरीवृत्ती त्यातून प्रगट होते. ॥२२॥

दुराभिमानामुळे  मत्सर उत्पन्न होतो. मत्सरातून तिरस्काराची भावना व तिच्यातूनच क्रोध उत्पन्न होतो. ॥२३॥

अशा प्रकारे ज्याचे अंतःकरणच नासलेले आहे तो अहंकाराने व क्रोधामुळे संतापतो, हे प्रत्यक्ष दिसते. ॥२४॥

कामक्रोधाने जो लिडबिडला आहे त्याला चांगला माणूस म्हणताच येत नाही. अमृत सेवन केल्यास वास्तविक अमर होता येते पण राहू हा दैत्य अमृतपान करूनही मरण पावला. (दासबोधासारख्या अमृतवचने असलेल्या ग्रंथाचे वाचन करताना मत्सरीवत्ती ठेवल्यास ग्रंथापासून कोणताच लाभ होणार नाही हे सांगण्यासाठी येथे राहूच्या पौराणिक

कथेचा दृष्टांत दिला आहे. भागवतामध्ये अष्टम स्कंधात ही कथा आहे : समुद्रमंथन प्रसंगी श्रीविष्णूंनी मोहिनीचे रूप घेऊन देवांना अमृत वाढले त्यावेळी राहू हा राक्षस लबाडीने देवांच्या पंक्तीत जाऊन बसला. त्याला अमृत वाढले देखील गेले! पण चंद्र सूर्य यांनी श्रीविष्णूंच्या ध्यानी ही गोष्ट इशाऱ्याने आणून दिली तेव्हा राहूने तोंडात घेतलेले अमृत त्याच्या पोटात जाण्यापूर्वीच त्याचा शिरच्छेद श्रीविष्णूंच्या सुदर्शनचक्रामुळे झाला. त्यामुळे राहूला मृत्यू आला. अशी ही कथा आहे.) ॥२५॥

हा विषय एवढाच पुरे. प्रत्येकाने ग्रंथातील घेता येईल तेवढे घ्यावे. अहंभाव बाजूला ठेवून ते घेण्याचा प्रयत्न करणे हे सर्वात उत्तम होय. ॥२६॥

प्रारंभी श्रोत्यांनी विचारले होते की या ग्रंथात काय सांगितले आहे ते येथपर्यंत संक्षेपाने सांगितले आहे. आता दासबोधाच्या श्रवणाचे फळ सांगतो. यामुळे माणसाच्या क्रियेमध्ये किंवा आचारामध्ये बदल घडतो. (दासबोध वाचनाच्या अनेक फलांचा उल्लेख आहे. पण 'वर्तनबदल' किंवा 'क्रियापालट' या बदलास श्रीसमर्थांनी प्राधान्य दिले आहे. **''अनुभव-प्राप्तीमुळे माणसाच्या वर्तनामध्ये इष्ट दिशेने घडून येणाऱ्या वर्तनबदलास 'शिकणे' असे म्हणतात.''** त्या दृष्टीने पाहिल्यास दासबोध हा एक शैक्षणिक ग्रंथ सुद्धा आहे. त्याच्यामुळे माणसाच्या विचारांमध्ये प्रथम बदल घडतो नंतर तो प्रत्यक्ष वर्तनात येतो.) माणसाच्या मनातील संदेहाचे मूळच नष्ट होते. (संदेह अनेक प्रकारचे असतात. शेंदूर फासलेले देव खरे आहेत का? येथपासून या सृष्टीच्या संचालनामध्ये 'ईश्वर' नावाची काही शक्ती असेल का? येथपर्यंत अनेक संदेह मनात असतात. दासबोधामुळे ते नष्ट होतात.) ॥२७, २८॥

सायुज्यमुक्तीचे रहस्य आकलनात येते आणि ती प्राप्त करण्याचा सुलभ मार्ग सापडतो. त्रासदायक किंवा कठीण साधनांची गरज लागत नाही. (सायुज्यमुक्ती म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमची सुटका होय. मानवाचे सर्वश्रेष्ठ ध्येय हेच मानले आहे.) ॥२९॥

आत्मस्थितीबद्दलचे अज्ञान, जीवनातील दुःख आणि भ्रामक समजुती नाहीशा होतात व ज्ञानाची प्राप्ती तत्काळ होते ही या ग्रंथाची फलप्राप्ती आहे. (मानवाच्या ज्या भ्रामक समजुती असतात त्यांची अधिक चर्चा दासबोधात द. दशक १०, समास ६ मध्ये आहे.) ॥३०॥

योग्यांचे परमभाग्य असे जे वैराग्य ते या ग्रंथामुळे प्राप्त होते. ''**व्यवहारामध्ये चातुर्याने आणि विवेकाने कसे वागावे ते कळते.** (ज्यांचा अहंकार नष्ट झाला नाही अशा योग्यांची उदाहरणे पुराणात अनेक आहेत, वैराग्य असल्याविना योगसाधना व्यर्थ होय. **जगात वागताना साधकबाधक विचार करणे आणि परमार्थामध्ये सार-असार याबद्दल विचार करणे म्हणजेच विवेक, तो अंगी बाणावा यासाठी दासबोधाचे नित्य वाचन करावे.)** ॥३१॥

भ्रमिष्ट, अवगुणी आणि अवलक्षणी माणसे या ग्रंथाच्या वाचनाने सुलक्षणी होतात. दुसऱ्याच्या मनातील दुष्ट हेतू समजण्याची धूर्तता, घटनांचे पृथःकरण करून सुयोग्य तर्क करण्याचे ज्ञान आणि कोणत्या समयी कसे वागावे हे सारे या ग्रंथामुळे समजते. ॥३२॥

आळशी माणसे उद्योगी व पापी माणसे पश्चात्तापाने पुण्यशील होतात. भक्तिमार्गाची निंदा करणारे प्रेमादराने भक्ती करू लागतात. ॥३३॥

बद्धांचे मुमुक्षू होतात व मूर्ख माणसे अतिदक्ष होतात. जे भक्तिहीन असतील त्यांना भक्तिमार्गाने मोक्ष प्राप्ती होते. (द. ५ मधील ७ व ८ हे दोन समास बद्ध आणि मुमुक्षू या संज्ञा समजून घेण्यासाठी जरूर वाचावेत. द्रव्य , दारा आणि प्रपंच यांचा सदैव विचार करणारे म्हणजेच दहबुद्धीची बेडी पडलेले 'बद्ध' असतात. ज्यांना संसाराबद्दल विरक्ती उत्पन्न होते आणि ईश्वरप्राप्तीची इच्छा होते ते मुमुक्षू होत.) ॥३४॥

माणसांचे अनेक दोष नाहीसे होतात. पापी माणसे पवित्र होतात. याच्या श्रवणाने चांगली गती प्राप्त होते. ॥३५॥

देहबुद्धीमुळे निर्माण होणारे अनेक प्रकारचे धोके, नाना प्रकारच्या संशयामुळे होणारे भ्रम आणि संसारातील हरतऱ्हेचे उद्वेग याच्या श्रवणाने नष्ट होतात. ॥३६॥

अशी या ग्रंथाची फलश्रुती आहे. याच्या श्रवणामुळे अवनति थांबते आणि **(वाऱ्याप्रमाणे चंचळ असलेल्या) मनास विश्रांती मिळून समाधान लाभते.** ॥३७॥

अशी दासबोधाची फलश्रुती आहे खरी पण ज्याची जशी मनोवृत्ती असेल तसेच फळ त्याला मिळेल. मत्सरग्रस्त मन किंवा दूषित दृष्टी ठेवून श्रवण करील त्याला त्याच धर्तीचे फळ मिळेल; हे सांगणे नकोच. (याच समासामध्ये २३ ते २६ या ओव्यांमध्ये याबद्दल विवेचन झाले आहे. ॥३८॥

॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ग्रंथारंभलक्षणनाम समास प्रथम ॥१॥

# दासबोध प्रवेश : प्रश्नपत्रिका पहिली

(दासबोध दशक १ समास १ 'ग्रंथारंभलक्षण' वर आधारित)

प्र. १ : पुढील ओव्यात गाळलेल्या जागा भरा.

१. नाना ............संमती। ............ वेदांत श्रुती। आणि मुख्य ..............। शास्त्रेसहित।।

२. नाना धोके..........। नाना किंत..........। नाना ........ संसाराचे। नासती श्रवणे।।

३. ....... योगें देव। निश्चयें पावती.........। ऐसा आहे ..........। इये ग्रंथी।।

प्र. २ : पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा. चूक असल्यास विधान बरोबर करून लिहा.

अ) दासबोध ग्रंथाला फक्त भगवद्‌गीतेचा आधार आहे.

ब) फक्त आत्मप्रचीतीच्या आधारावर दासबोध समर्थांनी लिहिला.

क) पूर्ण ग्रंथ वाचल्यानंतरच एखाद्या ग्रंथावर टीका करण्याचा अधिकार वाचकाला असतो.

प्र. ३ : दासबोध ग्रंथाची फलप्राप्ती सांगणाऱ्या दहा ओव्यांचा फक्त क्रमांक लिहून अर्थ सांगा.

प्र. ४ : पुढील ओव्यांच्या अर्थाचे स्पष्टीकरण थोडक्यात करा.

१) अमृत सेवितांच पावला। मृत्य राहो।।

२) जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा।।

प्र. ५ : दासबोधाचे वाचन आपण यापूर्वी केले आहे का?

या ग्रंथाचा संकल्प आपणास का करावासा वाटतो
याबद्दल सुमारे दहा ओळी लिहा.

किंवा

दासबोधाचे वाचन यापूर्वी आपण केले त्यावेळी आपणास कोणता समाधानदायी अनुभव आला हे सुमारे दहा ओळीत लिहा.

# दैनंदिन जीवनात दासबोध : स्वयंमूल्यमापन

प्रवेशच्या १२व्या स्वाध्यायाबरोबर **'स्वयंमूल्यमापन'** लिहून समीक्षकांचे अवलोकनार्थ पाठवावे.

१) प्रातःकाळी ६-०० पूर्वी आपण उठतो का?
२) आपण नित्य काही वाचन आणि पाठांतर करतो का?
३) अक्षर आणि वाचन सुंदर करण्याचा प्रयत्न करतो का?
४) आपण नित्य उपासनेकडे मन लावतो का?
५) आपण यत्नशील आहोत का?
६) आपला व्यवसाय दक्षतेने आपण करतो का?
७) आपण अखंड सावधानता कितपत पाळतो?
८) वागण्यात नियमितपणा कितपत पाळतो?
९) आपण आपल्या जिभेवर कितपत (बोलण्यात व आहारात ताबा मिळवला?
१०) आपण अनासक्तवृत्ती राखतो का?
११) संकटप्रसंगी आपण धीराने वागतो का?
१२) वर्तनात परिमितता राखतो का? (अति सर्वत्र वर्जयेत् ।)
१३) समजले ते आचरणात आपण आणतो का?
१४) आपण बोलल्याप्रमाणे वागतो का?
१५) दुसऱ्याचे अभिष्टचिंतन आपण करतो का?
१६) दुसऱ्यांचे दुःख समजून घेण्याचा प्रयत्न करतो का?
१७) दुसऱ्याचे सुखाने आपणही सुखी होऊ शकतो का?
१८) उत्तम पदार्थ दुसऱ्यास देण्याचा प्रयत्न करतो का?
१९) अनेक लोकांसाठी कष्ट घेतो का?
२०) संकटात मदतीचा हात इतरांना देतो का?
२१) आपले ज्ञान इतरांना देऊन शहाणे करतो का?
२२) उत्तम संगत धरण्याचा प्रयत्न करतो का?
२३) उत्कट आणि भव्य असेल ते स्वीकारण्याचा प्रयत्न करतो का?
२४) आपला 'मी'पणा कमी करण्याचा यत्न करतो का?
२५) मरणाचे स्मरण आपण नेहमी राखतो का?

वरील सर्व प्रश्न कागदावर लिहावेत आणि वरील प्रश्नपत्रिकेस स्वतःचे स्वतःच विचारपूर्वक गुण द्यावेत आणि स्वयंमूल्यमापन करावे. समीक्षकांकडे अवलोकनार्थ पाठवावे.

मा. चिपळूणकर यांनी असे उदगार काढले की ''हा समाज बदलला पाहिजे, वाढलेला भ्रष्टाचार आणि घसरणारी नीतिमूल्ये यांची चिंता वाटते, अस उदगार सर्वजण काढतात, पण आपण स्वतः बदलण्याचा आणि सदाचारी होण्याचा प्रयत्न कितपत करतो यालाच खरे महत्त्व आहे.''

स्वतःच्या वर्तनाचे मोजमाप करणारी मोजपट्टी त्यासाठी एक साधन आहे. तिचा वारंवार उपयोग करून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणे सुलभ होऊ शकते याचा अनुभव घ्यावा.

# श्रीमद् ग्रंथराज दासबोध अध्ययनाचा संकल्प

१. अभ्यासार्थीचे पूर्ण नाव (श्री/सौ./कु)........................................................................

२. वय.................... वर्षे ........... ३. शिक्षण.................. ४. व्यवसाय......................

५. आपला निवासी पत्ता (कृपया पिन कोडसह पूर्ण लिहावा.)
स्वाध्याय साधन याच पत्त्यावर पाठवले जाणार आहे.

.........................................................................................................................

.........................................................................................................................

६. मोबाईल / घरचा फोन..............................      ....................................................

८. ई-मेल आयडी आणि / अथवा "sw

९. आपल्याला या उपक्रमात कोणी आणले?.........................................................................

१०. अन्य काही कारण.........................................................................................................

११. मी हा अभ्यास ☐ पत्राद्वारे ☐ ई-मेलद्वारे करणार आहे.
(कृपया योग्य ठिकाणी बरोबरची खूण करावी.)

पत्राद्वारे - माझा पत्ता लिहिलेले पोस्टाचे पाकीट (पुरेशा पोस्टेजसह) आणि पहिला स्वाध्याय सोबत पाठवला आहे.
ई-मेलद्वारे - माझा पहिला स्वाध्याय आणि प्रवेश पत्र (पीडिएफ फॉरमॅट) मध्ये सोबत पाठवले आहे

या संकल्प पत्राबरोबर मी पहिला स्वाध्याय आणि शुल्क रु.५००/– भरत आहे.

**मी असा संकल्प करतो/करते की हा तिन्ही वर्षाचा अभ्यासक्रम ''प्रामाणिकपणे आणि नियमितपणे'' पूर्ण करीन. दर महिन्याच्या पौर्णिमेपूर्वी माझा स्वाध्याय समीक्षकांकडे पाठवला जाईल असा मी प्रयत्न करेन. या तिन्ही वर्षाच्या कालावधीत होणाऱ्या शिबिरांना मी उपस्थित राहण्याचा प्रयत्न करीन आणि श्री समर्थ चरित्र ग्रंथाचे वाचन करीन.**

दिनांक                                                                                  अभ्यासार्थी स्वाक्षरी

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

..........................................................................,,,,,,,,,,,,,,,.....................

**(कार्यालयीन उपयोगासाठी)**

नाव ..........................................................................................................

समीक्षकांचे नांव ..............................................................................................

अभ्यासार्थी क्रमांक ☐

श्री/सौ./श्रीमती.......................................................... यांना प्रवेश दिला असून रु.५००/–
शुल्क प्राप्त झाले आहे. उपरोक्त पत्त्यावर त्यांना स्वाध्याय-साधन पाठवून द्यावे.

दिनांक.................................                                    ................................
केंद्राचे नांव ................................                                    (केंद्रसंचालकाची स्वाक्षरी)

## ''क्रिया करूनी करवावी। बहुतांकरवी ।। ।।११-५-१६।।

श्री.दा.अ. उपक्रमाचे ब्रीदवाक्य वर उदधृत केले आहे. व्यक्तिगत साधनेइतकाच समर्थांचा भर जनप्रबोधनावर होता. **'सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे। परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।'** या ओवीचा उत्तरार्थ पहिल्या भागाइतकाच महत्त्वाचा आहे. ईश्वराचे अधिष्ठान असलेली चळवळ व्यक्तीला आणि समाजालासुद्धा तारक आहे. **'आपण करावें करवावें। आपण विवरावें विवरवावें। आपण धरावें धरवावें। भजनमार्गासी।।'** असा समर्थ रामदासांचा आग्रह आहे. पण --

**'विवेके क्रिया आपुली पालटावी। अतिआदरें शुद्ध क्रिया धरावी।।'** याप्रमाणे आपण स्वतः आचारविचाराने शुद्ध व्हावयाचे आणि मगच लोकांना तसे बनविण्याचा यत्न करावयाचा. यात सर्वांचेच कल्याण असते. या पाठ्यपुस्तकाचा उपयोग करून 'दासबोधाचा पत्रद्वारे/ई-मेलद्वारे अभ्यास' आपण करावा आणि इतरांनासुद्धा तशी प्रेरणा प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार देण्याचा यत्न करावा. अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या पुस्तकाचा उपयोग करून दासबोध अभ्यासवर्ग घेणे शक्य आहे. या पुस्तकाचे केवळ पारायण नको, अर्थ समजणे अगत्याचे आहे.

'श्री.दा.अ.' उपक्रमाचा अभ्यासक्रम समर्थ रामदासांच्या खालील सहा बोधवचनांवर आधारित आहे.

**१) यत्न तो देव जाणावा। यत्नेवीण दरिद्रता।।**
**२) या शरीरासारखे यंत्र। आणीक नाही।।**
**३) आधीं ते करावें कर्म। कर्ममागें उपासना।।**
**४) आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका।।**
**५) प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण।।**
**६) विवेकाचें फळ ते सुख।**
**हीच सहा 'बोधवचने' समर्थांनी दिली आहेत.**

## श्रीसमर्थांनी केलेली श्रीरामाची प्रार्थना

**कल्याण करी रामराया। जनहित विवरी।।धृ.।।**

**तळमळ तळमळ होतचि आहे। हे जन हातिं धरी।।१।।**

**अपराधी जन चुकतचि गेले। तुझा तूंची सांवरी।।२।।**

**कठिण त्यावरी कठीणची जालें। आतां न दिसे उरी।।३।।**

**कोठे जावें काय करावें। आरंभिली बोहरी।।४।।**

**दास म्हणे आम्ही केलें पावलों। दयेसि नाहीं सरी।।५।।**